अमरावती महानगरपालिका अमरावती
आयुक्त कार्यालय
मुख्य कार्यालय , राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१

जा.क्र.अमनपा / आयु / 412 /२०२५ दि. 24/ 10 /२०२५

**खाजगी ठिकाणे विक्री प्रक्षेत्रे**
**जाहिर सुचना**

**वाचा –** १. महाराष्ट्र महानरपालिका अधिनियम
२.पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन )-अधिनियम २०१४, दि.०३ ऑगस्ट २०१६
३.पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन ) योजना -२०१७, दि.९ जानेवारी २०१७ रोजीचा शासन निर्णय

ज्या अर्थी अमरावती शहराची वाढती लोकसंख्येचे दुष्टीने शहराचे अवलोकन केले असता असे निदर्शनास आले कि, शहरातून फेरीने व्यवसाय करणारे फेरीवाले यांचे संख्येत प्रचंड प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे महानगरपालिका क्षेत्रातील सर्वसामान्य नागरिकांना असुविधा, वाहतूकीची कोडी, सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य तसेच कोणत्याही प्रकारचा उपद्रव होवु नये या दृष्टिकोणातुन **महानगरपालिका स्तरावर पथविक्रेता ( उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन ) - अधिनियम २०१४ दि.०३ ऑगस्ट २०१६ मधिल प्रकरण ४ नियम ११ अन्वये नगर पथ विक्रेता समिति ( TOWN VENDING COMMITTEE ) गठीत करण्यात आलेली आहे.**

उक्त **पथविक्रेता ( उपजिविका संरक्षण व पथ विक्री विनियमन ) योजना - २०१७ मधिल नियम ७.२ अन्वये खाजगी ठिकाणे विक्री प्रक्षेत्रे** लोकहिताचे दुष्टीने फेरीवाला विक्री प्रक्षेत्रे घोषित करणे आवश्यक आहे.अमरावती महानरपालिका क्षेत्रात बहुतांश खाजगी भुखंड मुख्य रस्त्याचे लगत आहे, सदर भुखंडवर बांधकाम होई पर्यंत तात्पुरता स्वरुपात जागा नाममात्र शुल्क मध्ये उपलब्ध करुन दिल्यास नोंदणीकृत फेरीवाला यांना चारचाकी हातगाडी लावुन व्यवसाय करीता जागा उपलब्ध करुन देण्यात येईल

सदर भुखंडची देखरेख व स्वछता संबंधित फेरिवाला मार्फत करुन करण्यात येईल व भविष्यात सदर जागेवर बांधकाम करावयाचे असल्यास सदर जागा रिकामी करावयाची जवाबदारी महानगरपालिकेची राहील. तरी इच्छुक भुखंडधारक यांनी आपला प्रस्ताव लेखी स्वरुपात किवा marketandlicenceamc@gmail.com या ई-मेल वर जाहीर सूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांक पासून १५ दिवसाचे आत सहा. आयुक्त बाजार व परवाना विभाग झोन-२, हॉटेल ग्रेस ईन जवळ, राजापेठ, अमरावती येथे दाखल करावे.

**( सौम्या शर्मा -चांडक भा.प्र.से)**
**आयुक्त**
**महानगरपालिका, अमरावती**